<u>नियमित फौजदारी ख. क्र. ४०४/२०२५.</u>
निशाणी क्र. १३/क
सरकार वि. सुकदेव तडवी

<u>सदर साक्ष नोंदवितांना आरोपी न्यायालयासमक्ष व्ही.सी.द्वारे हजर.</u>

<u>तपास अधिकारी.</u>

## <u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.०४.</u>

मी शपथेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | : | चेतन मंगलाबाई साहेबराव सोनवणे |
| वय | : | ४० वर्षे, |
| धंदा | : | नोकरी पोहेकॉ.बनं. २७१ |
| सध्या ने. | : | शिरपूर शहर पोलीस ठाणे, ता. शिरपूर, जि. धुळे. |

<u>सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. आर. ए. पाडवी यांचेकडूनः</u>

१. गुन्हा क्र. ७०८/२०२४ चा तपास माझ्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान मला फिर्यादीने दिलेली तक्रार, ऑनलाईन प्रथम खबरी अहवालाची प्रत, फिर्यादीच्या चोरीला गेलेल्या आर.सी. पुस्तक व त्याच्या आर्धार कार्डची छायांकित प्रत प्राप्त झाली. त्यानंतर दि. ०१.०१.२०२५ रोजी मी दोन पंचांना सोबत घेवून घटनास्थळावर गेलो. घटनास्थळी बारकाईने निरिक्षण करुन दोन पंचांसमक्ष दि. ०१.०१.२०२५ रोजी सकाळी ०९.३० ते १०.०० वापर्यंत मी पंचनामा केला. घटनास्थळाच्या चतुसिमा खालीप्रमाणे –

पूर्वेस – शकुंतला लॉन्स

पश्चिमेस – स्वामी रेडीअम ते करवंद नाका कडे जाणारा सिमेंटचा रस्ता.

उत्तरेस – दक्षिणोत्तर करवंद ते स्वामी रेडीअम जाणारा रस्ता.

२. सदर पंचनामा मी दोषारोपपत्रासह दाखल केलेला आहे. तो दाखवला असता मी ओळखु शकतो. आता मला सदर पंचनामा दाखवला. त्यावर माझी व दोन पंचांची सही असून त्यातील मजकूर सत्य आहे. पंचांनी माझ्या समक्ष सहया केल्याने त्यांच्या सहया मी ओळखतो. सदर पंचनामा नि.क्र. पी–१/पीडब्लू–२ वर आहे.

POOJA NARAYAN KOKATE Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE Date: 2026.02.27 18:11:09 +0530

३.    पंचनामा केल्यानंतर मी **पोलीस अधिक्षक कार्यालय, धुळे येथे रेकॉर्डवरील गुन्हेगारांची व संशयीत आरोपीतांची माहिती घेणेबाबत पत्र दिले**. ते पत्र मी दोषारोपपत्रासह जोडलेले आहे. आता मला सदर पत्र दाखवले. ते तेच असून त्यावर माझी, प्रभारी अधिकारी यांची सही असून सदरील प्रत ही स्थळप्रत आहे. त्यातील मजकूर सत्य आहे. सदरील पत्रास **<u>निशाणी क्र. पी–१/पीडब्लू–४</u>** देण्यात येत आहे.

४.    त्यानंतर आमच्या **<u>बिट अंमलदार यांना मी अज्ञात आरोपी व चोरी गेलेले वाहन शोध घेणेकामी पत्र दिले</u>**.  ते पत्र मी दोषारोपपत्रासह जोडलेले आहे. आता मला सदर पत्र दाखवले. ते तेच असून त्यावर माझी, प्रभारी अधिकारी यांची सही असून सदरील प्रत ही स्थळप्रत आहे. त्यातील मजकूर सत्य आहे. सदरील पत्रास **<u>निशाणी क्र. पी–२/पीडब्लू–४</u>** देण्यात येत आहे.

५.    पत्र दिल्यानंतर मी माझ्या गुप्त बातमीदारांमार्फत काही आरोपीतांचा शोध तसेच चोरी केलेल्या वाहनाचा शोध सुरु केला. त्यामध्ये काही हासील झाले नाही. दि १०.०२.२०२५ रोजी **<u>पोलीस अधिक्षक, कार्यालय, धुळे यांचेकडील रेकॉर्डवरील गुन्हेगारांची माहिती टपालाद्वारे पत्राने प्राप्त झाली</u>**. आता मला सदर पत्र दाखवले. ते तेच असून त्यावर पोलीस निरिक्षक श्रीराम पवार व आमचे प्रभारी अधिकारी यांची सही असून सदरील प्रत ही मुळप्रत आहे. त्यातील मजकूर सत्य आहे. सदरील पत्रास **<u>निशाणी क्र. पी–३/पीडब्लू–४</u>** देण्यात येत आहे.

६.    रेकॉर्डवरील गुन्हेगारांची नावे आल्याने शिरपूर शहरामध्ये राहणा–या संतोष विठठल हटकर याच्या दि. १५.०२.२०२५ रोजी घरी जावून दोन पचांसमक्ष त्याच्या घराची घरझडती घेतली. नमूद गुन्हयातील मुद्देमाल मिळून आला नाही. त्याअनुषंगाने आम्ही तसा घरझडती पंचनामा केला. सदर घर झडती पंचनामा  मी दोषारोपपत्रासोबत दाखल केला आहे. तो दाखवला असता मी ओळखु शकतो. आता मला सदर **<u>घर झडती पंचनामा</u>** दाखवला.  त्यावर माझी व दोन पंचांची सही असून त्यातील मजकूर सत्य आहे. पंचांनी माझ्या समक्ष सहया केल्याने त्यांच्या सहया मी ओळखतो. सदर पंचनामा **<u>नि.क्र. पी–४/पीडब्लू–४</u>** वर आहे.

POOJA NARAYAN KOKATE
Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2026.02.27 18:11:13 +0530

७. दि. ०५.०३.२०२५ रोजी शिंदखेडा तालुक्यातील वालखेडा गांवी जावून रेकॉर्डवरील संशयित गुन्हेगार यांच्याकडे तपासणी केली पण, त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही. त्याचप्रमाणे पोलीस अधिक्षक कार्यालयाकडून रेकॉर्डवरील गुन्हेगारांची जी यादी मिळाली त्या सर्वांच्या घरी जावून झडती घेतली असता, त्यांच्याकडून गुन्हयातील मुद्देमाल मिळून आला नाही.

८. शहादा पो.स्टे. गुन्हा क्र. ५१८/२०२५ या गुन्हयामध्ये मोटारसायकल चोरी करणारा आरोपी यास ताब्यात घेण्यात आले. तेथील तपासी अंमलदार यांनी आम्हाला माहीती दिली की, सदर आरोपीताने तुमच्या गुन्हयातील मोटारसायकल चोरी केली असून ती शहादा पो.स्टे.ला जमा आहे. त्यानंतर शिरपूर येथील न्यायालयामध्ये आम्ही आरोपीताचा ट्रान्सफर वॉरंट मिळणेकामी दि. २६.०९.२०२५ रोजी अर्ज केला. त्या अर्जाप्रमाणे मा. न्यायालयाने आम्हाला ट्रान्सफर वॉरंट दिला. ते वॉरंट घेवून मी शहादा न्यायालयात गेलो. शहादा पोलीस स्टेशन मधील आरोपीताचा आमच्या गुन्हयाचे कामी वर्ग करणेकामी अर्ज केला. त्या अर्जावर मा. न्यायालयाने आम्हाला तुरुंगाधिकारी, नंदूरबार यांच्या नावे वॉरंट दिला. सुटया आल्याने त्यानंतर दि. २९.०९.२०२५ रोजी आम्ही नंदूरबार कारागृह येथे जावून आरोपी सुकदेव साईनाथ तडवी यास ताब्यात घेतले.

९ त्यानंतर आम्ही शहादा पो.स्टे. ला आलो. त्यानंतर गुन्हयात चोरीला गेलेली मोटारसायकल मी ताब्यात घेतली. तेथील तपासी अंमलदार यांनी तयार केलेला जप्ती पंचनामा व मुद्देमाल पावती मी ताब्यात घेतली. सदर जप्ती पंचनामा व मुद्देमाल पावती यांच्या शहादा पो.स्टे. च्या प्रमाणित प्रती मी दोषारोपपत्रासह दाखल केलेल्या आहेत. आरोपीला अटक करुन त्याचा **अटक पंचनामा <u>नि.क्र. पी–५–पीडब्लू–४</u>** तयार केला.

POOJA NARAYAN KOKATE
Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2026.02.27 18:11:18 +0530

१० आरोपीस अटक केल्यानंतर त्याच्या नातेवाईकांना माहिती दिली. आरोपीस विचारपूस केली असता, त्याने सांगितले की, ''मी दिनांक २७.१२.२०२४ रोजी शकुंतला लॉन्स येथून सदरची मोटारसायकल चोरी केली, ही तीच मोटारसायकल आहे''. सदर मोटारसायकल शिरपूर पो.स्टे. ला जमा करत असतांना मी साक्षीदारांना पो.स्टे. ला बोलाविले. त्यांनी ती आमचीच मोटारसायकल आहे असे ओळखले. त्यानंतर त्यांचा पुरवणी जबाब घेतला व मुद्देमाल पावती फाडली. सदर मुद्देमला पावती दोषारोपपत्रात जोडलेली आहे. आता मला सदर मुद्देमाल पावती दाखवली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर सत्य आहे. **<u>मुद्देमाल पावती निशाणी क्र. पी–६/पी.डब्लू–४</u>** देण्यात येत आहे.

११ साक्षीदारांना आम्ही सांगितले होते की, तुमची मोटारसायकल शहादा पो.स्टे ला मिळून आलेली आहे, त्यामुळे त्या मुद्यावर साक्षीदारांचा आम्ही पुरवणी जबाब घेतला. पुरवणी जबाबात फिर्यादी साक्षीदाराने असे सांगितले की, ''मी दिलेल्या आर.सी. बुक मधील चेसीस नंबर व इंजीन नंबर हा सारखाच असून सदरची गाडी माझी आहे''. तक्रारदारास त्या गाडीबाबत मी असे सांगितले की, आपण त्या गाडीबाबत न्यायालयामध्ये अर्ज करा. त्यानंतर त्याने केला व आम्हाला सांगितले की, मा. न्यायालयाने त्याच्या म्हणणेबाबत त्यांचा अर्ज मंजूर केला. मा. न्यायालयाचा अंतिम आदेश आल्यावर आम्ही अर्जदारास १०० रुपयाच्या बॉण्डवर अटी शर्तीवर त्यास त्याचे वाहन ताब्यात देवून फोटो काढला. आता मला सदर बॉण्ड दाखवला. त्यावर माझी, फिर्यादीची सही आहे. त्यातील मजकूर सत्य आहे. फिर्यादीने समक्ष सही केल्याने मी त्याची सही ओळखतो. सदर बॉण्ड हा पी–२/पीडब्लू–१ वर आहे. आता मला काढण्यात आलेला फोटो दाखवला. त्यामध्ये मी व फिर्यादी असून तो फोटो आर्टीकल अ वर आहे.

१२ संपूर्ण तपास झाल्यावर सदर गुन्हयाचे मी दोषारोपपत्र तयार केले. त्यानंतर त्याची छाननी केली. आरोपीवर मी असा दोषारोप ठेवला होता की, दि. २७.१२.२०२४ रोजी

POOJA NARAYAN KOKATE
Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2026.02.27 18:11:22 +0530

सायंकाळी ०६.०० ते ०७.४५ वा. दरम्यान शिरपूर शहरातील शकुंतला लॉन्स गेट जवळून यातील फिर्यादी आशिष प्रकाश जैन यांची एचएफ डिलक्स कंपनीची मोटारसायकल ही आरोपी नामे सुकदेव साईनाथ तडवी यांनी चोरी केली होती. ज्या आरोपीस मी ताब्यात घेतले तो मी पाहिला असता, ओळखु शकतो. आज रोजी सदर आरोपी व्ही.सी. द्वारे न्यायालयात हजर आहे. तो तोच आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस.जे. पाटील यांच्यामार्फतः</u>**

१३. सदर गुन्हयाचा तपास मला दि ३१.१२.२०२४ रोजी देण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोहेकॉ गिरासे यांनी पो.नि. यांच्या आदेशान्वये दिला. सदर फिर्याद ही पोहेकॉ गिरासे यांनी घेतलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, गिरासे यांनी तपास दिल्याबाबतचा लेखी आदेश नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. २७.१२.२०२४ रोजीची घटना असून तक्रार दि. ३१.१२.२०२४ रोजी देण्यात आलेली आहे. दि. ३१.१२.२०२४ रोजी सदर तक्रार ही १५.१० वाजता दाखल झाली व मला त्याचा तपास मी सायंकाळी ०७.०० ते ०७.३० वाजता पो.स्टे.ला आलो असता, प्राप्त झाला. हे म्हणणे खरे आहे की, दि. ३१.१२.२०२४ च्या सायंकाळी ०७.३० वाजता मला तपास प्राप्त झाल्यापासून ते दुस–या दिवसाच्या सकाळी ०९.३० वा. पर्यंत मी घटनास्थळी गेलो नाही व पंचनामाही केला नाही.

१४. प्रश्न – घटनास्थळी म्हणजे शकुंतला लॉन्स जवळ नगरपरिषदेने लावलेले हॅलोजन लाईट आहेत ?

उत्तर– त्यावेळेस फिर्यादीने सांगितले होते की, खुप वारा चालू होता व लाईट गेलेले होते.

१५. दि. ३१.१२.२०२५ रोजी फिर्यादी मला भेटला नाही. दि. ०१.०१.२०२५ रोजी फिर्यादी मला मी त्यास फोन केल्याने भेटला. हे मला माहीत नाही की, सदर गुन्हयाचे कामी

घटनास्थळाचे पंच म्हणून जे आहेत ते फिर्यादीचे नातेवाईक आहेत. सदर पंचांना मीच बोलाविले होते. सदर पंचांना पंच म्हणून उपस्थित राहण्यास मी विनंती केलेली होती. दि. ०१.०१.२०२५ रोजी मी पंचनामा करण्यापूर्वी पंचांना विनंती केली होती. पंचांना त्याकामी मी फोन केले व घटनास्थळी उपस्थित राहण्याचे सूचित केले. मी कोणत्या क्रमांकावरुन कोणत्या क्रमांकांना त्याकामी फोन लावले हे मला आठवत नाही. पंचांचा मला परिचय होता. मी त्यांना भेटलो होतो. ते पंच फिर्यादी जैन यांचे परिचयाचे असतील. मी फिर्यादीला त्याबाबत विचारले असता, त्याने त्या पंचांना ओळखत असल्याचे सांगितले व त्यानंतर त्यांचा नंबर मला दिला. फिर्यादीचा नंबर मला पाठ नाही.

१६. फिर्यादीला दि. ०१.०१.२०२५ रोजी बोलावून मी आधी सर्व विचारुन घेतले. फिर्यादी स्वयंपाकी म्हणून शकुंतला लॉन्सला कामाला होते. त्याबाबत मी त्यांना सर्व विचारले. पंचनाम्यासाठी मी घटनास्थळ पंचनाम्याचा छापील फॉर्म, पेन, पॅड, इ. साहित्य सोबत नेले.

१७. हे म्हणणे खरे नाही की, शकुंतला लॉन्सला लागून आजुबाजूला लागून दुकाने आहेत. घटनास्थळापासून ब-याच अंतरावर रस्त्याच्या पलिकडे एक फर्निचरचे एक दुकान आहे. घटनास्थळ शकुंतला लॉन्स चे गेट पासून पेट्रोल पंप ५० ते ६० मीटर अंतरावर आहे. घटनास्थळाच्या एकदम समोर सिमेंट कॉक्रीटचा रस्ता आहे. घटनास्थळाच्या पश्चिमेला जो रस्ता आहे त्याच्या पलिकडे महालक्ष्मी सुपर मार्केट, राम ड्रेसेस व विदया हॉस्पीटल आहे. हे म्हणणे खरे आहे की, तेथील स्थानिक पंच मी घेतले नाही.

१८. फिर्यादीने तक्रार दिल्याने त्याचा जबाब पंचनामा करण्यापूर्वी अथवा नंतर घेतला नाही. आरोपी निष्पन्न झाल्यानंतर फिर्यादीचा जबाब दि. ३०.०९.२०२५ रोजी घेतला. त्यानंतर फिर्यादीचा जबाब घेतला नाही. सदर आरोपीस दि. २९.०९.२०२५ रोजी मी नंदूरबार जेल मधून ताब्यात घेतले. आरोपीस ताब्यात घेतल्यानंतर शहादा पो.स्टे. ला मी लगेचच नेले.

POOJA NARAYAN KOKATE
Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2026.02.27 18:11:28 +0530

त्यास मी शहादा पोलीस स्टेशन मध्ये नेले नव्हते. मला तेथून जप्ती पंचनामा व मुद्देमाल पावती घ्यायची होती म्हणून मी आमच्या सरकारी गाडीतच शहादा पो.स्टे. बाहेर ठेवले होते.

१९. दि. २९.०९.२०२५ रोजी मी मोटारसायकल ताब्यात घेतली. मोटारसायकल ताब्यात घेण्यापूर्वी ती ताब्यात घेतल्याबाबतचा कोणताही पंचनामा केला नाही. शहादा पो.स्टे. च्या ताब्यात माझ्या ताब्यात गाडी घेतल्याबाबतची कुठलीही ताबा पावती मी त्या पो.स्टे. ला दिली नाही. शहादा पो.स्टे. वरुन सदर गाडी मी एका पोलीस शिपाई विलास कोळी ज्यांना मी सोबत घेवून गेलो होतो त्यांच्यामार्फत आणली. पोलीस शिपाई विलास कोळी यांचेमार्फत शिरपूर पो.स्टेला मोटारसायकल आणल्याची नोंद मी घेतली नाही.

**<u>मध्यंतराची वेळ झाल्याने उलटतपास तहकूब</u>.**

श्रवणोत्तर स्वीकृत

POOJA NARAYAN KOKATE
Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2026.02.27 18:11:32 +0530

शिरपूर.
दिनांक २७.०२.२०२६.

(श्रीमती पूजा ना. कोकाटे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.१),
शिरपूर, जि. धुळे.
**JO Code-2489**

**<u>मध्यंतरानंतर साक्षीदाराचा शपथेवर उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस.जे. पाटील यांचेकडून सुरु</u> -**

२०. विलास कोळी यांनी शहादा पो.स्टे. मधून शिरपूर पो.स्टे. ला सदर मोटारसायकल त्याच दिनांकास आणली. हे म्हणणे खरे आहे की, आशिष प्रकाश जैन याने या न्यायालयात सदर मोटारसायकल परत मिळणेकामी जुलै २०२५ मध्ये अर्ज केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणात जैन यांच्या ताब्यात आमच्या ताब्यातील मोटारसायकल देण्यास नाहरकत असल्याचे म्हणणे मी दिले. शहादा पो.स्टे. च्या ताब्यात सदर मोटारसायकल किती तारखेस अथवा महिन्यात मिळाली हे मी सांगू शकत नाही. या आरोपीस शहादा पो.स्टे. यांनी कोणत्या दिनांकास ताब्यात घेतले हेही मला सांगता येणार नाही.

२१. हे म्हणणे खरे आहे की, मोटारसायकल आणल्यानंतर आम्ही मुद्देमाल पावती फाडली. हे म्हणणे खरे आहे की, मुद्देमाल पावती फाडल्यावर त्यावर मुद्देमाल कारकूनाची सही असते. आता मला नि.क्र. पी-६/पीडब्लू-४ वरील मुद्देमाल पावती दाखवली. त्यावर मुद्देमाल कारकून यांची सही नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर सदर पावती कोणत्या दिनांकास फाडली हेही नमूद नाही.

२२. हे म्हणणे खरे नाही की, अशा नंबरची कोणतीही मोटारसायकल मी शहादा वरुन आणली नव्हती. मुळ मालकाच्या ताब्यात गाडी देतांना मी त्याचा वेगळा पंचनामा केला नाही. गाडी ताब्यात देतांनाचा फोटो मी स्वतः माझ्या मोबाईलने काढले. आता मला आर्टीकल ए वरील फोटो दाखवला. तो सेल्फी काढलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सुकदेव याने या गुन्हयातील मोटारसायकल चोरी केलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने दिलेल्या फिर्याद प्रमाणे कोणतीही मोटारसायकल मी शहादा पो.स्टे. मधून आणली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सर्व पंचनामे मी पो.स्टे. ला केले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कोणतीही कबूली मला दिली नाही.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

POOJA NARAYAN KOKATE
Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2026.02.27 18:11:40 +0530

शिरपूर.
दिनांक २७.०२.२०२६.

(श्रीमती पूजा ना. कोकाटे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.१),
शिरपूर, जि. धुळे.
**JO Code-2489**